दूरध्वनी क्र. २२६१८२६१ फॅक्स क्र. २२६१८२६२

**महाराष्ट्र कौन्सिल ऑफ इंडियन मेडिसीन**

(महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम १९६१ अन्वये महाराष्ट्र शासनाद्वारे गठीत)

२३१,कॉमिसरीएट इमारत, तिसरा मजला, डीबीएस बँकेजवळ, डी.एन.रोड, फोर्ट, मुंबई – ४००००१.

ई–मेल : mahacim.mumbai@gmail.com वेबसाईट : www.mcimindia.org.in

| डॉ. आशुतोष गुप्ता | डॉ. दत्तात्रय पाटील | डॉ. दिलीप वांगे |
| --- | --- | --- |
| अध्यक्ष | उपाध्यक्ष | प्रबंधक |

जा.क्र. एमसीआयएम/१७०१३७४/२०१७ दि. २५.०१.२०१७

# परिपत्रक

**विषयः– आयुर्वेद व युनानी वैद्यक व्यवसायिकांच्या आधुनिक चिकित्सा पद्धतीचा (Allopathy) व्यवसाय करण्याचे अधिकार व इतर हक्कांविषयी.**

महोदय,

उपरोक्त विषयान्वये महाराष्ट्र भारतीय चिकित्सा परिषद, **(MCIM)** मुंबईमध्ये प्राप्त झालेल्या सूचना व तक्रारी नुसार परिषदेच्या असे लक्षात येत आहे की, वैद्यकीय क्षेत्रातील विविध संस्था, गृहखाते, सामान्य प्रशासन व सार्वजनिक आरोग्य इत्यादी विभागातील अनेक अधिकारी या परिषदेकडे नोंदणीकृत वैद्यकीय व्यवसायिकांच्या वैद्यक व्यवसायासंबंधीचे हक्क व अधिकारांविषयी अनभिज्ञ आहेत.

भारतीय केंद्रीय वैद्यक परिषद अधिनियम १९७०, महाराष्ट्र शासनाने काढलेली २५ नोव्हेंबर १९९२ ची अधिसूचना, महाराष्ट्र शासनाने दि. २३ फेब्रुवारी १९९९ रोजी काढलेला शासन आदेश तसेच डॉ. मुख्तियार चंद विरुद्ध पंजाब राज्य व इतर [(१९९८) ७ एस.सी.सी. ५७९] यामध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेलया निर्देशांच्या अधिन राहून तसेच राज्य कायद्यामधील संलग्न असलेल्या अनुसूचीतील अ, अ–१, ब आणि ड अर्हता धारण करणाऱ्या राज्य नोंदवहीत नोंदणीकृत असलेल्या आयुर्वेद व युनानी वैद्यकीय व्यवसायीकांच्या आधुनिक शास्त्रीय वैद्यक पद्धत म्हणून ओळखल्या जाणाऱ्या विषमचिकित्सा वैद्यक पद्धतीचा **(Allopathy)** व्यवसाय करणेचा अधिकार व इतर हक्कांविषयी संदिग्धता दूर व्हावी व अशा नोंदणीकृत आयुर्वेद व युनानी वैद्यक व्यवसायीकांना त्यांच्या वैद्यक व्यवसायामध्ये पूर्णत्वाने व सक्षमतेने वैद्यकीय सेवा देण्यात अटकाव होवू नये यासाठी भारतीय केंद्रीय वैद्यक परिषद अधिनियम १९७० च्या कलम १७ व महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम १९६१ च्या कलम १४, २५,३४ चा व्यापक अर्थ लक्षात घेऊन महाराष्ट्र भारतीय चिकित्सा परिषद, **(MCIM)** मुंबई हे परिपत्रक प्रस्तुत करत आहे.

डॉ. मुख्तियार चंद विरुद्ध पंजाब राज्य व इतर १९९८ [७ एस.सी.सी. ५७९] यामध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने विषम चिकित्सा वैद्यक पद्धत **(Allopathy)** तसेच भारतीय चिकित्सा पद्धती यामधील वैद्यक व्यवसायींचे हक्क स्पष्ट केले आहेत.

महाराष्ट्र राज्यात शासनाने काढलेली अधिसूचना वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग क्र. सीआयएम १०९१/सी.आर. १७९/९१ (भाग–पाच) ॲक्ट दि. २५.११.१९९२ अन्वये असे

दूरध्वनी क्र. २२६१८२६१ फॅक्स क्र. २२६१८२६२

# महाराष्ट्र कौन्सिल ऑफ इंडियन मेडिसीन

(महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम १९६१ अन्वये महाराष्ट्र शासनाद्वारे गठीत)

२३१,कॉमिसरीएट इमारत, तिसरा मजला, डीबीएस बॅकेजवळ, डी.एन.रोड, फोर्ट, मुंबई – ४०००0१.

ई–मेल : mahacim.mumbai@gmail.com वेबसाईट : www.mcimindia.org.in

डॉ. आशुतोष गुप्ता **अध्यक्ष** | डॉ. दत्तात्रय पाटील **उपाध्यक्ष** | डॉ. दिलीप वांगे **प्रबंधक**

जा.क्र. एमसीआयएम/१७०१३७४/२०१७ दि. २५.०१.२०१७



निर्देश दिले आहेत की, महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम १९६१ या कायद्याला संलग्न असलेल्या अनुसूची अ, ब आणि अ–१ मध्ये विनिर्दिष्ट केलेली अर्हता धारण करणाऱ्या भारतीय वैद्यक पद्धतीमधील वैद्यक व्यवसायींच्या राज्य नोंदवहीत नाव नोंदणी केलेले आयुर्वेदीय वैद्यक व्यवसायी, आधुनिक वैद्यक पद्धत म्हणून ओळखल्या जाणाऱ्या विषम चिकित्सा पद्धतीचा **(Allopathy)** त्या पद्धतीमधून त्यांनी घेतलेल्या प्रशिक्षणाच्या व्याप्तीपुरता, व्यवसाय करण्यास पात्र असतील. तसेच महाराष्ट्र शासनाने औषधी द्रव्ये विभाग व सौंदर्य प्रसाधन नियम, १९४५ च्या तरतूदीनुसार आणि शासकीय आदेश नगरविकास व सार्वजनिक आरोग्य विभाग क्र. डीआरजी ११६०/६९९१९ ब दि. ०५ जून १९६५ चे अधिक्रमण करुन काढलेल्या शासकीय आदेश वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग क्र. सीआयएम १०९९/१२२/सी.आर. २५/ ॲक्ट दि. २३.०२.१९९९ च्या अन्वये घोषित केले आहे की, महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम १९६१ याला जोडलेल्या अनुसूचीच्या भाग अ, अ–१, ब आणि ड मध्ये त्या त्या वेळी नमूद केलेल्या अर्हता धारण करणाऱ्या व सदर कायद्यांतर्गत ठेवण्यात येणाऱ्या नोंदवहीत ज्यांची नावे नोंदविण्यात आलेली आहेत, अशा व्यक्ती औषधे व सौंदर्य प्रसाधन कायदा, १९४० (१९४० चा २३) या कायद्याचे प्रयोजने पार पाडण्याकरिता आधुनिक वैद्यक चिकित्सा पद्धतीचा अवलंब करण्यास पात्र राहतील.

तसेच महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम १९६१ मधील कलम २५ उपकलम ४ नुसार नोंदणीकृत व्यवसायींना, ज्याकरिता त्यांची नोंदणी करण्यात आली असेल अशा भारतीय वैद्यक पद्धतीबरोबर आधुनिक शास्त्रीय वैद्यक पद्धत म्हणून ओळखल्या जाणाऱ्या विषम चिकित्सा पद्धतीचा त्या पद्धतीमधून त्यांनी घेतलेल्या प्रशिक्षणाच्या व्याप्तीपुरता व्यवसाय करण्याचा अधिकार देण्यात आलेला आहे.

तसेच महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम १९६१ मधील कलम २५ उपकलम ५ नुसार पदव्युत्तर अर्हता करणारे भारतीय वैद्यक पद्धतीमधील नोंदणीकृत व्यवसायी नवीनतम ज्ञान कौशल्ये व तंत्रशास्त्रविषयक प्रगतीचा वापर करण्यास व व्यवसाय करण्यास पात्र असतील. तसेच विशेष शाखेनुसार **(Speciality)** उदा. स्त्रीरोग व प्रसुती चिकित्सा, शल्यचिकित्सा, नेत्र, कान, नाक, घसा, मानसरोग आदी विशेष शाखेमध्ये अंतर्भूत असणारे औषधोपचार, विविध शल्यकर्मे, कौशल्ये यामध्ये आधुनिक तंत्रज्ञान, उपकरणे, यंत्र शस्त्रे याचा वापर करण्यास पात्र असतील.

तसेच महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम १९६१ मधील कलम २५ (३), ३४ व भारतीय केंद्रीय वैद्यक परिषद अधिनियम, १९७० मधील कलम १७ (२), नुसार नोंदणीकृत

दूरध्वनी क्र. २२६१८२६१ फॅक्स क्र. २२६१८२६२

# महाराष्ट्र कौन्सिल ऑफ इंडियन मेडिसीन

(महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम १९६१ अन्वये महाराष्ट्र शासनाद्वारे गठीत)
२३१,कॉमिसरीएट इमारत, तिसरा मजला, डीबीएस बॅकेजवळ, डी.एन.रोड, फोर्ट, मुंबई – ४००००१.
ई–मेल : mahacim.mumbai@gmail.com वेबसाईट : www.mcimindia.org.in

डॉ. आशुतोष गुप्ता
अध्यक्ष

डॉ. दत्तात्रय पाटील
उपाध्यक्ष

डॉ. दिलीप वांगे
प्रबंधक

जा.क्र. एमसीआयएम/१७०१३७४/२०१७ दि. २५.०१.२०१७



आयुर्वेद व युनानी व्यवसायिकांनी दिलेले कोणत्याही कायद्यान्वये आवश्यक असलेले वैद्यकीय किंवा स्वास्थ्य प्रमाणपत्र किंवा कोणतेही इतर प्रमाणपत्र वैध असेल.

तसेच वर नमूद नोंदणीकृत वैद्यकीय व्यवसायिक स्वत:चे खाजगी हॉस्पिटल, मॅटर्निटी होम अथवा नर्सिंग होम त्यांचे नावावर नोंदणी करणेसाठी अर्ज व आवश्यक कागदपत्रे संबंधित कार्यालयाकडे सादर केल्यानंतर काही संबंधित कार्यालयाकडून आधुनिक चिकित्सा पद्धतीमधील **(Allopathy)** औषधोपचार करणेसाठी तसेच **Operation Theater** चे नोंदणी करणेसाठी कमीतकमी **M.B.B.S.** अर्हतेचे वैद्यकीय व्यवसायिक या ठिकाणी नियुक्त करणे आवश्यक आहे, अशी अट घालण्यात येते असे निदर्शनास आले आहे. तथापि द बॉम्बे नर्सिंग होम रजिस्ट्रेशन ॲक्ट १९४९ च्या कलम २ मधील उपकलम ६ च्या उपलब्धीनुसार **Qualified Medical Practitoners** या व्याख्येत उपरोक्त वैद्यकीय व्यवसायिक यांचा समावेश होत असल्याने, अशा नोंदणीकृत वैद्यकीय व्यवसायिकांना शैक्षणिक अर्हतेविषयी इतर अटी लादणे हे प्रचलित कायद्याचे उल्लंघन ठरते. तसेच महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम १९६१ मधील कलम २५ उपकलम (४) व (५) नुसार नोंदणीकृत आयुर्वेद व युनानी पदवी व पदव्युत्तर पदवीधारक आधुनिक चिकित्सा पद्धतीचा सक्षमतेने व्यवसाय करणेस पात्र असल्याने या नोंदणीकृत वैद्यकीय व्यवसायिकांचे नावे **The Bombay Nursing Home Act 1949** अन्वये हॉस्पिटल रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र देणे कायद्यानुसार आवश्यक आहे.

वैद्यकीय क्षेत्राशी संबंधित सर्व शासकीय, निमशासकीय तसेच खाजगी संस्थांनी उपरोक्त कायदेविषयक वस्तुस्थितीची नोंद घेऊन वर नमूद शासकीय परिपत्रके व आदेशांचे पालन करुन त्यानुसार उचित निर्णय घ्यावेत.

आपला विश्वासू,

(डॉ. डी. यु. वांगे)
प्रबंधक